# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र.२०४/२०२२

विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील अध्यापकांच्या सेवाअंतर्गत पदोन्नतीसाठी विद्यापीठ परिसरात दि. ०८ जानेवारी ते १४ जानेवारी, २०२१ या दरम्यान मुलाखती आयोजित केल्या होत्या. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील मुद्दा क्र. 7.4 (B) (IV) (iii) नुसार प्राध्यापकांच्या सेवा अंतर्गत पदोन्नतीच्या मुलाखती ज्या दिनांकास होतील त्या दिनांकापासून उक्त पदोन्नती लागू होईल असे नमूद करण्यात आलेले आहे.

सदर मुलाखतीच्या दरम्यान महाविद्यालयातील अध्यापकांच्या सेवाअंतर्गत पदोन्नतीसाठीच्या वेळी एखाद्या सेवा कनिष्ठ अध्यापकांची मुलाखत अगोदरच्या दिनांकास व सेवा ज्येष्ठ अध्यापकांची मुलाखत नंतरच्या दिनांकास झाली असल्यामुळे काही महाविद्यालयात सेवाज्येष्ठतेचा प्रश्न निर्माण झाला असल्याबाबत निवेदने विद्यापीठाकडे प्राप्त झाली आहेत.

यासंदर्भात कळविण्यात येते की, दि. ०८ जानेवारी ते १४ जानेवारी, २०२१ दरम्यान आयोजित सेवाअंतर्गत पदोन्नतीच्या मुलाखतींमध्ये ज्या अध्यापकांची सेवाअंतर्गत पदोन्नती झाली आहे त्यांच्याबाबत केवळ सेवाज्येष्ठतेवर परिणाम होऊ नये म्हणून अशा सर्व अध्यापकांच्या सेवाअंतर्गत पदोन्नतीचा मानीव दिनांक १४ जानेवारी, २०२१ असा ग्राहय धरण्यात यावा.

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७<br>
जा. क्र. सीसीओ/२०८३<br>
दि. ११ जुलै, २०२२

(डॉ. मुंजाजी रासवे)<br>
उपकुलसचिव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**<br>
मा. प्राचार्य, सर्व संबंधित संलग्नित अशासकीय महाविद्यालये,<br>
पुणे, अहमदनगर व नाशिक